महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
१ ला मजला, विस्तार इमारत,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
Email ID :- mahamandale-sjsa@mah.gov.in

क्र.ऊकाकम-२०२४/प्र.क्र.१७३/महामंडळे दिनांक :- १६ फेब्रुवारी, २०२४ .

प्रति,

व्यवस्थापकीय संचालक,
गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ, पुणे.

विषय :- मयत ऊसतोड कामगार यांच्या कुटूंबिय/ वारस यांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देण्याबाबत.

संदर्भ :- आपले पत्र क्र.ऊकाकमपुणे/ऊसतोडकामगार/आर्थिक मदत/ २३-२४/१३, दिनांक २९/१/२०२४.

उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये मयत ऊसतोड कामगारांच्या कुटूंबिय/वारस यांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केलेली आहे.

२. शासनस्तरावर ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार व मुकादम यांच्याकरिता अपघात विमा योजना राबविण्याचे प्रस्तावित आहे. परंतु, सदर अपघात विमा योजनेची अंमलबजावणी होण्यासाठी काही अवधी लागणार असल्याने सद्य:स्थितीत ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार व मुकादम यांचा अपघाती मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटूंबिय/वारस यांना आर्थिक मदत देण्याची बाब प्रस्तावित आहे.

३. सबब, ज्या ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार व मुकादम यांचा अपघाती मृत्यू झाला आहे, अशा व्यक्तींच्या अपघाती मृत्यूबाबत संबंधित जिल्हाधिकारी, उप आयुक्त / सहायक आयुक्त, समाज कल्याण यांनी सोबत जोडलेल्या "प्रपत्र-अ" नुसार कागदपत्रांची पडताळणी /पुराव्याची छाननी करुन पात्र ठरलेल्या ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार व मुकादम यांचे कुटूंबिय/वारस यांना रु.५.०० लक्ष (अक्षरी रुपये पाच लक्ष फक्त ) इतक्या रकमेचे आर्थिक सहाय्य देण्याबाबत शासन मान्यता देण्यात येत आहे.

४. व्यवस्थापकीय संचालक, गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ, पुणे यांनी उपरोक्त कागदपत्रांद्वारे ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार व मुकादम यांचा अपघाती मृत्यू झाल्याबाबतची खातरजमा केल्यानंतरच त्यांचे कुटूंबिय/वारस यांना प्रत्येकी रु.५.०० लक्ष (अक्षरी रुपये पाच लक्ष फक्त ) इतक्या रकमेच्या धनादेशाचे वाटप करण्यात यावे, व केलेल्या कार्यवाही बाबत शासनास अवगत करावे.

(वर्षा देशमुख)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत- निवडनस्ती.

प्रपत्र -अ

अपघाताच्या परताव्यासाठी सादर करावयाची कागदपत्रे

| अ.क्र. | अपघाताचे स्वरुप | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|
| १. | रस्ता रेल्वे अपघात | प्रथम माहिती अहवाल, स्थळ पंचनामा, इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल |
| २. | पाण्यात बुडून मृत्यू | प्रथम माहिती अहवाल/ पोलीस पाटील अहवाल,स्थळ पंचनामा, इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल व अशा प्रकारच्या अपघातातील मृत व्यक्तीचे प्रत न सापडल्यास ६ महिन्यांच्या प्रतिक्षेनंतर कुटूंबातील सदस्याचे घोषणापत्र (Declaration) व अपघातग्रस्त खातेदाराचा बुडून मृत्यू झाल्याचे सक्षम प्राधिका-याचे तलाठी/ग्रामसेवक प्रमाणपत्र |
| ३. | विजेचा धक्का बसल्यामुळे झालेला अपघात | प्रथम माहिती अहवाल/ पोलीस पाटील अहवाल, स्थळ पंचनामा, इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मोर्टेम अहवाल (विजेचा धक्का (Electric Shock) बसून झालेल्या अपघात प्रकरणी वीज वितरण कंपनीचा अहवाल /प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक नाही) |
| ४. | वीज पडून मृत्यू | प्रथम माहिती अहवाल/ पोलीस पाटील अहवाल, स्थळ पंचनामा, इन्क्वेस्ट पंचनामा,पोस्ट मोर्टेम अहवाल, |
| ५. | उंचावरुन पडून झालेला अपघात | प्रथम माहिती अहवाल / पोलीस पाटील अहवाल, स्थळ पंचनामा, इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल |
| ६. | जंतुनाशके हाताळतांना अथवा अन्य कारणामुळे विषबाधा | प्रथम माहिती अहवाल/ पोलीस पाटील अहवाल, पोस्ट मॉर्टेम अहवाल, व्हिसेरा रिपोर्ट, (रासायनिक विश्लेषण अहवाल) |
| ७. | सर्पदंश/विंचू दंश/ जनावराने चावा घेणे/<br>रेबीज/कोणत्याही प्राण्याने जखमी केल्यामुळे अपंगत्व येणे किंवा मृत्यू ओढावणे. | उपलब्धतेनुसार प्रथम माहिती अहवाल/, पोलीस पाटील अहवाल, इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल, रासायनिक विश्लेषण अहवाल (Viscera Report), शव विच्छेदन अहवाल (P. M. Report) किंवा वैद्यकीय विश्लेषण अहवाल उपलब्ध होऊ शकत नसल्यास अशा प्रकरणी अपघातग्रस्ताच्या अपंगत्व अथवा मृत्यूबाबतचे इंडियन मेडिकल असोसिएशनचे मान्यताप्राप्त वैद्यकीय व्यावसायिकाने दिलेले प्रमाणपत्र, किंवा प्राथमिक आरोग्य केंद्र/उपकेंद्र येथील सक्षम अधिका-याने दिलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. श्वापदाने अपघातग्रस्ताचे शरीर ओढत नेल्यामुळे व खाऊन टाकल्यामुळे मृतदेह सापडत नसल्यास ६ महिन्यांच्या प्रतिक्षेनंतर कुटूंबातील सदस्याचे घोषणापत्र (Declaration) व अपघातग्रस्त व्यक्ती श्वापदाच्या हल्ल्यामुळे मृत्यू पावली असे सक्षम प्राधिका-याचे (तलाठी/ग्रामसेवक) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.) |
| ८. | नक्षलवाद्याकडून झालेल्या हत्या | प्रथम माहिती अहवाल, स्थळ पंचनामा, इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल |
| ९. | दंगलीमध्ये अपंगत्व अथवा मृत्यू | प्रथम माहिती अहवाल, स्थळ पंचनामा, इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल |
| १०. | खून | प्रथम माहिती अहवाल/ स्थळ पंचनामा, इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल |
| ११. | आगीमुळे अपघात झालेला | प्रथम माहिती अहवाल / पोलीस पाटील अहवाल, पोस्टमॉर्टेम अहवाल (जर अपघातग्रस्त ऊसतोड मजूराचे शरीर आगीत पूर्णपणे जळून भस्म झाले असेल तर अपघातग्रस्तांच्या कुटुंबियांचे घोषणापत्र (Declaration) व सक्षम प्राधिकाऱ्याचे (तलाठी/ग्रामसेवक) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे) |
| १२. | अन्य कोणतेही अपघात | प्रथम माहिती अहवाल / पोलीस पाटील अहवाल, स्थळ पंचनामा, इन्क्वेस्ट पंचनामा, आणि सक्षम प्राधिका-याने अपघात पडून मृत्यू झाल्याचे/ कायमचे अपंगत्व आल्याचे दिलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकित सत्य प्रत. |